दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ३१ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८५ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, त्रयोदशी सकाळी ६-५६ पर्यंत
दिवस नक्षत्र- पूर्वा दुपारी ३-२१ पर्यंत नंतर उत्तरा
चंद्र रास- सिंह रात्री ९-३३ पर्यंत, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर

**पुणे**: राज्यातील प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर झाली आहे. २ मे ते १४ जून पर्यंत राज्य मंडळाच्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच, पुढील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्य विदर्भ व इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १५ जून रोजी सुरु होणार आहे. विदर्भाचे तापमान विचारात घेता १५ जून ते २९ जून पर्यंत सकाळच्या सत्रात सकाळी सात ते ११.४५ यावेळेत शाळा सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## सारांश वृत्त

### चीनी नेतृत्वाखालील गुंतवणुकीला विरोध

**नवी दिल्ली** : भारताने सांगितले की, चीनच्या नेतृत्वाखालील वादग्रस्त 'इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन फॉर डेव्हलपमेंट' कराराला जागतिक व्यापार संघटनेच्या चौकटीत समाविष्ट करण्यास भारताने तीव्र विरोध केला आहे. आयएफडी कराराच्या समावेशामुळे डब्ल्यूटीओच्या कार्यात्मक मर्यादा कमी होण्याचा आणि त्याच्या मूलभूत तत्त्वांना कमजोर करण्याचा धोका आहे, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटले आहे.

### उपायुक्ताला ६ लाख घेताना रंगेहात पकडले

**हुबळी (कर्नाटक) :** वाणिज्य कर विभागाचे उपआयुक्त भरत कुमार हेगडे हे सोमवारी ६ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले गेले, अशी माहिती लोकायुक्त अधिकाऱ्यांनी दिली. लोकायुक्तांकडे तक्रार दाखल झाल्यानंतर, अंकोला येथील ५३ वर्षीय व्यावसायिक विश्वजित नायक यांच्याकडून पैसे स्वीकारताना ४८ वर्षीय हेगडे यांना रंगेहाथ पकडण्यात आले, अशी माहिती बंगळूरू लोकायुक्तांचे पोलीस अधीक्षक शिवप्रकाश देवराज यांनी दिली.

### सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले वाढले

**भुवनेश्वर :** गेल्या दोन वर्षांत ओडिशाच्या विविध जिल्ह्यांमध्ये सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला होण्याच्या आणि त्यांच्याशी गैरवर्तन करण्याच्या एकूण १,३९९ घटनांची नोंद झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी विधानसभेत दिली. बीजेडी आमदार प्रसन्न आचार्य यांच्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना माझी म्हणाले की, २०२४-२५ या आर्थिक वर्षात अशा ६३२ घटनांची नोंद झाली, तर २०२५-२६ मध्ये हा आकडा ७६७ पर्यंत वाढला.

### ट्रम्प यांचा कडक इशारा; होर्मुझ सामुद्रधुनी उघडण्याची मागणी

# तर इराणच्या ऊर्जा संरचना उद्ध्वस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन** : पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट आणि कठोर इशारा देत तणाव अधिक वाढवला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी तातडीने व्यापारासाठी खुली करण्यात आली नाही आणि लवकरच कोणताही करार झाला नाही, तर इराणमधील तेल विहिरी, वीज प्रकल्प आणि खार्ग बेटसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले केले जातील, अशी स्पष्ट धमकी त्यांनी दिली.

ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'ट्रुथ'वरील पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिका इराणमधील



परिस्थिती बदलण्यासाठी "नवीन आणि अधिक समंजस राजवटीसोबत" चर्चा करत आहे. या चर्चेत प्रगती होत असल्याचे त्यांनी सांगितले, मात्र त्याचवेळी लष्करी कारवाईचा इशारा देत दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला. "जर करार झाला नाही आणि होर्मुझची सामुद्रधुनी तातडीने खुली झाली नाही, तर आम्ही इराणमधील वीज प्रकल्प, तेल विहिरी, खार्ग बेट आणि जलशुद्धीकरण प्रकल्प उद्ध्वस्त करू," असे ट्रम्प यांनी स्पष्टपणे म्हटले. आतापर्यंत अमेरिका या पायाभूत सुविधांना मुद्दाम लक्ष्य केले नसल्याचे सांगत त्यांनी भविष्यातील कारवाईचा संकेत दिला. या इशाऱ्यामुळे आधीच तणावग्रस्त असलेल्या पश्चिम आशियात युद्ध आणखी तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेल्या संघर्षाला आता एक महिना पूर्ण झाला असून, या काळात ३,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणनेही प्रत्युत्तरादाखल इस्रायल आणि आखाती देशांतील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले आहेत. यामुळे संघर्षाचा विस्तार संपूर्ण प्रदेशात होत असल्याचे चित्र आहे. या संघर्षात सर्वाधिक महत्त्वाची भूमिका होर्मुझच्या सामुद्रधुनीची ठरत आहे. जगातील सुमारे २० टक्के तेल व्यापार या मार्गावरून होतो. इराणने या जलमार्गावर नियंत्रण मिळवल्याने जागतिक ऊर्जा बाजारपेठेत मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे.

याचबरोबर, इराण समर्थित हुथी बंडखोरही संघर्षात उतरल्याने लाल समुद्रातील बाब-अल-मंदेब या आणखी एका महत्त्वाच्या जलमार्गावरील वाहतुकीला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे जागतिक व्यापार आणि ऊर्जा पुरवठ्यावर दुहेरी दबाव निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या इशाऱ्यामुळे तोडगा निघण्याऐवजी संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत असून, जागतिक अर्थव्यवस्था आणि ऊर्जा सुरक्षेवर याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## अवकाळी पावसाची राज्यभर हजेरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्यात भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही भागात उष्णतेपासून दिलासा मिळाला असला, तरी शेती पिकांवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

पुणे शहरात सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारच्या सुमारास बाणेर, शिवाजीनगर, पुणे स्टेशन, हडपसर आणि लोणी काळभोर परिसरात मुसळधार पाऊस झाला. काही सखल भागात पाणी साचल्याने नागरिकांची गैरसोय झाली. पिंपरी-चिंचवड येथेही सुमारे अर्धा तास जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या सरींमुळे रस्त्यांवरील नागरिकांची धावपळ उडाली.

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यासह काही भागात पावसाच्या सरी कोसळल्या. या अवकाळी पावसामुळे बीजवाई कांदा, आंबा, फळबागा आणि भाजीपाला पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ३० मार्च ते ४ एप्रिलदरम्यान राज्यातील हवामानात मोठा बदल होणार आहे. खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील घाट भागात मेघगर्जनेसह पाऊस, ताशी ३० ते ५० किमी वेगाने वादळी वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. विशेषतः १ एप्रिलपासून पावसाची तीव्रता वाढण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

## डॉ. आंबेडकर स्मारक २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मुंबईतील इंदू मिल येथे उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम विहित मुदतीत आणि अधिक गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याची माहिती विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिली.

अण्णा बनसोडे सध्या दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर असून त्यांनी गाझियाबाद येथे प्रख्यात शिल्पकार राम सुतार यांच्या कार्यशाळेला भेट देऊन इंदू मिल स्मारकासाठी तयार होत असलेल्या पुतळ्याच्या कामाची सविस्तर पाहणी केली. यावेळी पुतळ्याच्या कामाची सद्यस्थिती, तांत्रिक प्रक्रिया आणि पुढील कामाचा आढावा त्यांनी घेतला. पाहणीनंतर महाराष्ट्र सदन येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रकल्पाच्या आर्थिक आणि तांत्रिक स्थितीबाबत माहिती दिली. स्मारकासाठी आवश्यक असणाऱ्या मुख्य धातूंच्या जागतिक दरात मोठी वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या मूळ निविदा दर आणि सध्याच्या प्रत्यक्ष खर्चामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. यासाठी अतिरिक्त निधीची तातडीने तरतूद करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या वाढीव निधी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

### शरद पोंक्षे यांचा कठोर शब्दांत इशारा

# ...तर संघ दहा भाजप उभे करू शकतो!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : भाजपने सत्तेच्या अहंकारात राहू नये, भाजपची काँग्रेस व्हायला लागली तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कट्टर हिंदुत्व मानणाऱ्या दहा भाजप उभ्या करू शकतो, असा इशारा ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांनी दिला. राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित तीन दिवसीय रामस्मरण व्याख्यानमालेत 'भारत एक हिंदू राष्ट्र' या विषयावर ते बोलत होते. रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृहात हा कार्यक्रम झाला.



कार्यक्रमात बोलताना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या संबंधांवर भाष्य केले. संघाने शंभर वर्षे अनेक उपेक्षा सहन करूनही संघटन उभे ठेवले असून आज संघ ताठ उभा आहे, असे त्यांनी सांगितले. संघ ही भाजपची आई आहे, असे म्हणत त्यांनी भाजपने सत्ता कायमची आपलीच आहे, या अहंकारात राहू नये, असा इशारा दिला.

"भाजपची काँग्रेस व्हायला लागली तर संघ दहा भाजप उभे करू शकतो. पुन्हा दहा-पंधरा वर्षे वाट पाहावी लागली तरी चालेल, पण कट्टर हिंदुत्व मानणाऱ्या दहा भाजप उभ्या करण्याची ताकद संघात आहे," असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. मोदी सरकारमुळे आज हिंदू सण-उत्सव मोठ्या थाटात साजरे केले जात आहेत. 'गर्वाने म्हणा आम्ही हिंदू आहोत' असे म्हणण्याची ताकद मोदी सरकारमुळे आली, असे त्यांनी सांगितले. या कामाचे संपूर्ण श्रेय मोदींसोबत संघालाही जाते, असे त्यांनी नमूद केले.

काँग्रेसवर टीका करताना त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही निशाणा साधला. मधल्या काळात राहुल गांधी पंतप्रधान झाले असते तर देशाचे मोठे नुकसान झाले असते, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या कोणत्याही आंदोलनामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले नाही, तसेच हा पक्ष ब्रिटिशांनी स्थापन केला होता, असा दावा त्यांनी केला. मनुस्मृती आणि हिंदू धर्मग्रंथांबाबत बोलताना पोंक्षे म्हणाले की, मनुस्मृती जाळणाऱ्यांनी ती वाचलेली नाही. हिंदू धर्मातील प्रत्येक धर्मग्रंथ महान असून हजारो वर्षांपूर्वी अनेक शोध आपल्या धर्मग्रंथांमध्ये नमूद आहेत. मात्र मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीमुळे भारतीयांना स्वतःच्या धर्म आणि संस्कृतीचा अभ्यास करता आला नाही, असे त्यांनी सांगितले.

भारताच्या स्वरूपाबाबत बोलताना त्यांनी भारत हा हिंदू राष्ट्र होता, आहे आणि राहील, अशी भूमिका मांडली. स्वातंत्र्याला अनेक वर्षे उलटूनही हिंदूबहुल देशात हिंदूंनाच स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो, ही शोकांतिका असल्याचे ते म्हणाले. हिंदू समाज संघटित झाला तरच परिस्थिती बदलेल आणि भारत अधिकृतरित्या हिंदू राष्ट्र घोषित व्हायला हवा, असेही त्यांनी स्पष्ट केले. या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात नव्या चर्चेला तोंड फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### महायुती सरकारवर हर्षवर्धन सपकाळ यांचा हल्लाबोल

# शेतकरी प्रश्नांवर काँग्रेसची 'संघर्ष न्याय यात्रा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तुळजापूर** : राज्यातील शेतकरी प्रश्न, वाढती महागाई आणि केंद्र-राज्य सरकारच्या धोरणांविरोधात काँग्रेसने काढलेल्या 'सुरतगाव ते तुळजापूर शेतकरी संघर्ष न्याय यात्रे'तून सरकारवर जोरदार टीका करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या यात्रेदरम्यान भाषण करताना केंद्रातील आणि राज्यातील सरकारवर थेट निशाणा साधत शेतकरीविरोधी धोरणांचा आरोप केला.

सपकाळ म्हणाले की, राज्यातील शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडला असून, त्याला शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. आत्महत्यांचे प्रमाण वाढत असताना सरकारकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेल्या व्यापार करारामुळे भारतीय शेतीला मोठा फटका बसणार असल्याचे सांगत "या करारामुळे देशातील शेतकरी उद्ध्वस्त होईल," अशी तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. राज्य सरकारच्या कर्जमाफी घोषणेवरही त्यांनी टीका केली. "फडणवीस सरकारची कर्जमाफी ही 'लबाडाघरचे जेवण, जेवल्याशिवाय खरे नाही' अशी आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला नाही," असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे ७/१२ उतारे कोरे करण्याची मागणी केली.

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात आयोजित या यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला. सकाळी सुरतगाव येथून सुरू झालेली ही यात्रा तुळजापूर येथे सभेने संपन्न झाली. यात्रेत गॅस सिलिंडर ठेवलेल्या ट्रॅक्टरद्वारे इंधन व गॅस टंचाईकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रसंगी काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, आदित्य अशोकराव पाटील, दादासाहेब मुंडे, अमर खानापुरे, धाराशिव जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, तसेच बीड, लातूर आणि नांदेड येथील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला व शेतकऱ्यांचा सहभागही लक्षणीय होता. महागाई, बेरोजगारी, इंधन टंचाई यांसारखे प्रश्न गंभीर झाले आहेत, मात्र सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यांनी असाही आरोप केला की, संविधानाच्या मूल्यांची पायमल्ली केली जात असून हुकूमशाही प्रवृत्ती वाढत आहे. सभेच्या शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले.

### बंगालमध्ये तिसरी पुरवणी यादी जाहीर

**कोलकाता** : निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अंतर्गत तिसरी पुरवणी मतदार यादी प्रसिद्ध केली. मात्र, शुक्रवारी रात्री दुसरी पुरवणी यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आलेल्या तिसऱ्या यादीतील एकूण वगळलेल्या किंवा समाविष्ट केलेल्या नावांच्या संख्येबद्दल निवडणूक आयोगाने तपशील दिला नाही. आयोगाने २३ मार्च रोजी 'न्यायनिर्णयाधीन' मतदारांची पहिली पुरवणी यादी प्रसिद्ध केली होती, परंतु त्या यादीतून वगळलेल्या नावांची संख्या किंवा निकाली काढलेल्या प्रकरणांच्या अचूक आकड्याबद्दल मौन बाळगल्यामुळे विविध स्तरांवरून टीका झाली.

## स्पेनने अमेरिकेला आकाशक्षेत्र नाकारले

### नाटो सदस्य असूनही ठाम भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**माद्रिद** : इराणविरोधात सुरू असलेल्या अमेरिकेच्या लष्करी मोहिमेला मोठा राजनैतिक धक्का बसला असून स्पेन ने अमेरिकन लष्करी विमानांसाठी आपले आकाशक्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. स्पेनने केवळ आपल्या भूमीवरील लष्करी तळांचा वापर नाकारला नाही, तर अमेरिकन लष्करी विमानांना स्पेनच्या हवाई हद्दीतून उड्डाण करण्यासही बंदी घातली आहे.

स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी अमेरिकेने इराणवर केलेले हल्ले 'एकतर्फी' असल्याचे स्पष्ट करत या युद्धाला पाठिंबा देण्यास नकार दिला आहे. नाटो, संयुक्त राष्ट्र किंवा युरोपियन युनियन यांची अधिकृत संमती नसताना हे युद्ध सुरू असल्याने स्पेनने या कारवाईपासून स्वतःला दूर ठेवले आहे. स्पेन हा नाटोचा पूर्णवेळ सदस्य देश असतानाही त्यांनी घेतलेली ही भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. इराणवरील हल्ले आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधात असल्याचे स्पेनने म्हटले आहे. स्पेनमध्ये जनतेचा मोठ्या प्रमाणावर युद्धाला विरोध असल्याने सांचेझ सरकारने जनमताचा विचार करून हा निर्णय घेतल्याचेही सांगितले जात आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे अमेरिका आणि स्पेन यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी स्पेनवर व्यापार निर्बंध घालण्याची धमकी दिल्याचेही वृत्त आहे. मात्र या दबावाला न जुमानता स्पेनने आपली भूमिका कायम ठेवली आहे. स्पेनच्या या निर्णयामुळे अमेरिकन लष्करी विमानांना आता स्पेनला वळसा घालून उड्डाण करावे लागणार आहे. त्यामुळे उड्डाणाचा वेळ वाढणार असून इंधन खर्चही मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. स्पेनच्या हवाई हद्दीचा आणि तळांचा वापर अमेरिका करत होती.

### पिंपरी चिंचवड पत्रकार संघ व डिजिटल मिडिया परिषद पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने

# जागतिक महिला दिनानिमित्त पत्रकारांकडून रणरागिणींचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील सायन्स पार्क येथे दिनांक २९ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळेत जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्वोत्कृष्ट रणरागिणींचा सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई, संलग्न असलेल्या पिंपरी चिंचवड पत्रकार संघ व डिजिटल मिडिया परिषद पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर गोपाळ सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात झालेल्या




या कार्यक्रमाला मान्यवरांसह शेकडो नागरिक उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रविभाऊ लांडगे आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. .

विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या या सोहळ्यांमध्ये राजमाता जिजाऊ पुरस्कार - डॉ. किशोरी आपटे, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार - सुप्रिया सचिन मंडलिक, त्यागमूर्ती माता रमाई पुरस्कार - सुभद्रा आत्माराम मोकाशे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार - स्वरांजली माने, पशुवैद्यकीय सेवारत्न पुरस्कार - डॉ. पूजा बोंबले, पिंपरी चिंचवड संस्काररत्न पुरस्कार - भारतीय न्यायाधीश, पिंपरी चिंचवड कलारत्न - ज्योती भीमाशंकर सेतसंदी, पिंपरी चिंचवड सिनेरत्न पुरस्कार - कृत्तिका तुळसकर, आणि रुग्णसेवा विशेष सन्मान स्वाती कुलकर्णी, शोभा तळेकर, शोभा ढोले यांना प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर पिंपरी चिंचवड शहरातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एकूण १४ महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये पद्मजा, मैत्री अपंग, समृद्धी, आई, श्रीकृष्ण, साई चरण, सुनिधी, आनंदी, साई, जीवन ज्योती, जास्वंदी, विघ्नहर्ता, रोहिणी आणि यशोदा महिला बचत गटांचा सन्मानचिन्ह व वृक्ष रोप देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रमिला सुनील आढाव (महिंद्र स्पेअर बिझनेस युनीट, कान्हे हेड ऑफ दी डिपार्टमेंट - डेटा एन्ट्री विभाग) यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड शहराचे महापौर रविभाऊ लांडगे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, मार्गदर्शक उपस्थिती अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद विश्वस्त शरद पाबळे, परिषद उपाध्यक्ष गणेश मोकाशी, पुणे जिल्हाध्यक्ष सुनील लोणकर मंचावर उपस्थित होते. तर परिषद जिल्हा पदाधिकारी चिराग फुलसुंदर, अनिल वडघुले, श्रीमती रेखा भेगडे, मारुती बानेवार, श्रीमती प्रज्ञा आबनावे, याच बरोबर पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे व डिजिटल मिडियाचे शिलेदार डिजिटल मिडिया शहर उपाध्यक्ष संतोष गोतावळे, महावीर जाधव, अशोक कोकणे, रमेश साठे, अनंता इंगळे, अविनाश कांबीकर, डॉ. देवीदास शेलार, पराग डिंगणकर, संजीव सूर्यवंशी, माऊली भोसले, सिद्धांत चौधरी, हनुमंत रामदासी, राकेश पगारे, जेष्ठ परिषेद सदस्य प्रकाश जमाले, किशोरअण्णा लष्करे, नरेश जीनवाला, श्रीमती अनुष्काताई, विजय न्यायाधीश, राहुल जाधव, इत्यादी पत्रकार उपस्थित होते. तसेच सन्मानार्थी निवड समितीमध्ये लिटिल सायंटिस्टचे दत्तात्रय गिरमकर, निलेश बोराडे, आणि काव्य मित्रचे राजेंद्र सगर उपस्थित होते. दरम्यान या सन्मान सोहळ्यामध्ये काव्य मैफिल संपन्न झाली. कवी प्रकाश गायकवाड, कवी देवेंद्र गावंडे, प्राध्यापिका कवयित्री सुषमा भालेराव यांनी उपस्थितांची मने जिंकणाऱ्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डिजिटल मिडिया परिषद शहराध्यक्ष विनय सोनवणे यांनी केले तर आभार परिषद सदस्य अनिल वडघुले यांनी मानले. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## संपादकीय

# अमेरिकी युद्धाचा जुनाच धडा



**पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेकडून इराणमध्ये जमिनीवरील सैन्य पाठवण्याच्या शक्यतेने जुने प्रश्न पुन्हा डोके वर काढले आहेत. आधुनिक युद्धतंत्र बदलले असले तरी एक गोष्ट कायम आहे. जमिनीवर उतरलेले युद्ध हे नेहमीच अनिश्चित, दीर्घ आणि नियंत्रणाबाहेर जाणारे ठरते.**

इराणविषयी अमेरिकेची भूमिका पुन्हा आक्रमक होत असल्याचे संकेत अलीकडील विधानांतून दिसतात. इराणच्या तेल निर्यातीसाठी अत्यंत महत्त्वाच्या खार्ग बेटावर नियंत्रण मिळवण्याची कल्पना मांडली जात आहे. वरकरणी हा लष्करी पर्याय वाटतो; पण प्रत्यक्षात तो आर्थिक आणि राजकीय दडपशाहीचा भाग आहे. तेलावर नियंत्रण म्हणजे इराणच्या अर्थव्यवस्थेची नस दाबणे. पण प्रश्न इतकाच नाही. जमिनीवरील युद्धाचा विचार आला की इतिहास समोर उभा राहतो. अमेरिकेने यापूर्वी व्हिएतनाम, इराक आणि अफगाणिस्तानमध्ये सैन्य पाठवले. प्रत्येक वेळी प्रारंभी लष्करी वर्चस्व स्पष्ट दिसले; पण युद्ध जसजसे लांबले तसतसे उद्दिष्ट धूसर होत गेले. कारण जमिनीवरील युद्ध हे फक्त रणनितीवर चालत नाही; ते स्थानिक समाज, राजकारण आणि मनोवृत्ती यांच्याशी गुंतलेले असते. व्हिएतनाम युद्धाचा अनुभव विशेष बोलका आहे. बाहेरील शक्तीला स्थानिक प्रतिकार किती महागात पडू शकतो, याचा तो धडा होता. इराक आणि अफगाणिस्तानमध्येही तसाच अनुभव आला. शासन बदलता आले; पण स्थैर्य निर्माण करता आले नाही. म्हणजे युद्ध जिंकता आले, पण शांतता नाही. इराणचा संदर्भ या सगळ्यांपेक्षा अधिक गुंतागुंतीचा आहे. तो केवळ भौगोलिकदृष्ट्या मोठा नाही, तर राजकीयदृष्ट्याही संघटित आणि राष्ट्रवादी आहे. त्याच्याकडे प्रादेशिक प्रभाव आहे, मित्र राष्ट्रे आहेत आणि अप्रत्यक्ष लढाई लढण्याची क्षमता आहे. त्यामुळे इराणमध्ये जमिनीवरील कारवाई म्हणजे एका सीमित संघर्षाची नव्हे, तर व्यापक प्रादेशिक अस्थिरतेची शक्यता. खार्ग बेटाचा मुद्दा येथे महत्त्वाचा ठरतो. हे बेट इराणच्या तेल निर्यातीचे मुख्य केंद्र आहे. ते ताब्यात घेणे म्हणजे इराणला आर्थिकदृष्ट्या गळा दाबणे. पण अशा कारवाईचा परिणाम केवळ इराणपुरता मर्यादित राहणार नाही. होर्मूज सामुद्रधुनी, आखाती देश, जागतिक तेल बाजार आणि सागरी वाहतूक यावर त्याचे पडसाद उमटतील. म्हणजेच लष्करी निर्णयाचा आर्थिक स्फोट होईल. या संदर्भात एक मूलभूत प्रश्न विचारावा लागतो. एखादा भूभाग ताब्यात घेतल्याने युद्ध जिंकले जाते का. इतिहास सांगतो की तसे होत नाही. युद्धाचे खरे उद्दिष्ट राजकीय असते. त्या उद्दिष्टाचा स्पष्ट आराखडा नसेल, तर लष्करी विजय अर्थहीन ठरतो. इराणच्या बाबतीत हे अधिक लागू होते. कारण येथे केवळ भूभाग नव्हे, तर विचारसरणी आणि प्रभाव यांचा संघर्ष आहे. अमेरिकेच्या लष्करी क्षमतेवर प्रश्न नाही. प्रश्न आहे तो त्या क्षमतेच्या मर्यादांचा. जमिनीवरील युद्धात पुरवठा, संरक्षण, स्थानिक विरोध आणि दीर्घकालीन उपस्थिती यांचा प्रश्न निर्माण होतो. युद्ध जितके लांबते तितका खर्च वाढतो आणि राजकीय दबाव वाढतो. शेवटी निर्णय रणांगणावर नव्हे, तर देशांतर्गत राजकारणात घेतला जातो. आजच्या काळात युद्धाचे स्वरूप बदलले आहे. सायबर हल्ले, आर्थिक निर्बंध, ड्रोन, प्रॉक्सी गट या माध्यमातून देश आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी पारंपरिक जमिनीवरील युद्ध हा पर्याय मागे पडलेला वाटतो. तरीही तो पुन्हा चर्चेत येतो, कारण तो तात्कालिकदृष्ट्या निर्णायक वाटतो. पण त्याचे परिणाम नेहमीच अनपेक्षित असतात. या संघर्षाचा परिणाम भारतासारख्या देशांवरही होणार हे निश्चित. भारताची ऊर्जा गरज मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे पश्चिम आशियातील अस्थिरता थेट महागाई, चलन आणि आर्थिक वाढ यावर परिणाम करते. त्यामुळे भारतासाठी हा प्रश्न केवळ परराष्ट्र धोरणाचा नाही; तो आर्थिक स्थैर्याचा आहे. हा प्रश्न एका देशाच्या निर्णयाचा नाही. तो जागतिक व्यवस्थेच्या दिशेचा आहे. मोठ्या शक्ती पुन्हा जमिनीवरील युद्धाच्या मार्गाने प्रश्न सोडवू लागल्या, तर जग पुन्हा अस्थिरतेकडे जाईल. नियम, करार आणि संवाद यांची जागा शक्ती घेईल. इतिहासाचा धडा स्पष्ट आहे. युद्ध सुरू करणे सोपे असते; पण ते संपवणे कठीण असते. आणि जमिनीवरील युद्ध सुरू झाले की त्याचा शेवट कोणाच्या हातात राहात नाही. म्हणूनच अशा प्रत्येक निर्णयामागे एक प्रश्न कायम उभा राहतो आणि तो म्हणजे पुढे काय. हा प्रश्न जितका उशिरा विचारला जातो, तितकी त्याची किंमत अधिक मोजावी लागते, हे इतिहास आपल्याला पुन्हा पुन्हा सांगेल.

# भारत आणि चीन यांचे विरोधाभासी संबंध



**» भारत आणि चीन यांचे संबंध हे नेहमीच विरोधाभासी राहिले आहेत. सहकार्य आणि संघर्ष, व्यापार आणि तणाव, संवाद आणि अविश्वास या सर्व गोष्टी एकाच वेळी या नात्यात अस्तित्वात असतात. या नात्यांना नुकतेच नवे वळण मिळाले आहे. त्यामुळे भारताच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.**

भारत आणि चीन या दोन अर्थव्यवस्था केवळ आकाराने मोठ्या नाहीत, तर आकांक्षांनीही मोठ्या आहेत. दोघांनाही जागतिक व्यवस्थेत आपली भूमिका अधिक ठळक करायची आहे. पण ही भूमिका एकमेकांच्या विरोधात उभी राहते. चीनने गेल्या चार दशकांत औद्योगिक शक्ती उभी केली, उत्पादन साखळीवर नियंत्रण मिळवले आणि जागतिक व्यापारात अग्रस्थान घेतले. भारत अजून त्या प्रवासाच्या मध्यावर आहे. त्यामुळे या नात्यात समता आहे, असे मानणे हे वास्तवाकडे डोळेझाक करणे ठरेल.

चीनकडून 'तांगो'ची उपमा येते, तेव्हा तिचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. तांगो हा नृत्यप्रकार दोन व्यक्तींचा असतो, पण त्यात नेतृत्व एकाकडे असते. चीनला या नात्यात नेतृत्व हवे आहे, हे त्याच्या धोरणातून स्पष्ट दिसते. व्यापार, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, प्रादेशिक राजकारण या सर्व क्षेत्रांत चीनने आधीच आघाडी घेतली आहे. त्यामुळे तो सहकार्याची भाषा बोलतो, पण अटी त्याच्याच असतात.

भारताच्या दृष्टीने सर्वात मोठा प्रश्न आर्थिक आहे. द्विपक्षीय व्यापार वाढत असला तरी त्यात मोठी तूट आहे. भारत मोठ्या प्रमाणावर चीनकडून आयात करतो, विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स, यंत्रसामग्री, रसायने आणि मध्यम वस्तू. याचा अर्थ भारताची उत्पादन साखळी अजूनही चीनवर अवलंबून आहे. हा केवळ व्यापाराचा प्रश्न नाही; तो धोरणात्मक स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. कारण आर्थिक अवलंबित्व असले की राजकीय निर्णयही मर्यादित होतात.

सीमेवरील तणाव हा या नात्याचा दुसरा चेहरा. लडाखमधील संघर्षानंतर दोन्ही देशांनी संवाद ठेवला आहे, सैन्य मागे घेण्याचे काही टप्पे पूर्ण केले आहेत. पण विश्वासाची पातळी पूर्ववत झालेली नाही. उलट, दोन्ही बाजूंनी सीमारेषेजवळील पायाभूत सुविधा वाढवल्या आहेत. म्हणजेच वरकरणी शांतता असली तरी अंतर्गत तणाव कायम आहे. याचवेळी चीन भारताला सहकार्याचे आवाहन करतो. जागतिक दक्षिण, बहुपक्षीय मंच, व्यापार, हवामान बदल या मुद्द्यांवर एकत्र येण्याची भाषा वापरतो. ही भाषा केवळ सदिच्छेची नसून रणनीतीचा भाग आहे. अमेरिका आणि पश्चिमेकडील देशांसोबतच्या स्पर्धेत चीनला भारतासारख्या देशाची गरज आहे. भारत जर पूर्णपणे पश्चिमेकडे झुकला, तर चीनसाठी तो धोका ठरतो. त्यामुळे चीन भारताला जवळ ठेवण्याचा प्रयत्न करतो.

भारतासाठी हा क्षण सावधपणे चालण्याचा आहे. चीनसोबत संवाद ठेवणे आवश्यक आहे, कारण दोन्ही देश शेजारी आहेत आणि अनेक जागतिक प्रश्नांवर त्यांचे हित एकमेकांशी जुळते. पण त्याचवेळी भारताने आपले दीर्घकालीन हित लक्षात ठेवले पाहिजे. सहकार्य आणि स्पर्धा यांचा समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे. भारताने स्वतःची क्षमता वाढवणे हा एकमेव टिकाऊ मार्ग आहे. उत्पादन क्षेत्र, तंत्रज्ञान, संशोधन, संरक्षण, पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत भारताने प्रगती केली नाही, तर चीनसोबतच्या नात्यात समतोल साधणे कठीण जाईल. आत्मनिर्भरता ही घोषवाक्यापुरती न राहता ती प्रत्यक्ष धोरणात उतरली पाहिजे.

परराष्ट्र धोरणात भारताने घेतलेली बहुविध भूमिका येथे महत्त्वाची ठरते. अमेरिका, युरोप, जपान, रशिया आणि चीन या सर्वांशी संबंध ठेवून भारत स्वतःची जागा निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. ही भूमिका सोपी नाही.

याच मार्गाने भारत आपले स्वातंत्र्य टिकवू शकतो. चीनसोबतच्या नात्यातील एक मोठा धोका म्हणजे आत्मसंतुष्टता. संवाद सुरू आहे, व्यापार सुरू आहे, तणाव कमी झाला आहे असे वाटू लागले की वास्तव दुर्लक्षित होते. पण चीनची धोरणे दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण असतात. तो अल्पकालीन लाभासाठी धोरण बदलत नाही. त्यामुळे भारतानेही दीर्घकालीन दृष्टी ठेवली पाहिजे.

'ड्रॅगन आणि हत्तीचे नृत्य' ही उपमा आकर्षक असली तरी ती भ्रामकही ठरू शकते. कारण नृत्याचा ताल जर एकाच्याकडे असेल, तर दुसरा फक्त त्यानुसार हालचाल करतो. भारताने ही भूमिका स्वीकारली तर ते त्याच्या दीर्घकालीन हितासाठी धोकादायक ठरेल. शेवटी प्रश्न असा नाही की भारत चीनसोबत सहकार्य करणार की नाही. प्रश्न असा आहे की त्या सहकार्याच्या अटी कोण ठरवणार. त्या अटी भारताने ठरवल्या, तर हे नाते समतोल राहील. पण जर त्या अटी बीजिंगकडून ठरवल्या गेल्या, तर भारताचे स्वातंत्र्य मर्यादित होईल, हे लक्षात घेतले पाहिजे.

# पाणीटंचाई टाळण्यासाठी सर्वंकष उपाय राबवा

## महापौरांचे प्रशासनाला कडक निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** शहरात उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी तातडीने सर्वंकष उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहेत.

उपलब्ध जलसाठा, भूजल पातळीतील घट आणि वाढती पाण्याची मागणी लक्षात घेऊन प्रशासनाने तत्काळ नियोजन करणे गरजेचे असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले. नागरिकांना नियमित, समतोल आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करणे ही महापालिकेची वैधानिक जबाबदारी असून सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले. महापौरांनी प्रशासनाला उन्हाळा पूर्व कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या असून प्रत्येक विभागाला स्पष्ट जबाबदाऱ्या देण्याचे निर्देश दिले आहेत.

उपलब्ध धरण साठा, जलशुद्धीकरण केंद्रे आणि वितरण यंत्रणेचे सखोल परीक्षण करून पाणीपुरवठ्याचे अचूक नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

शहरातील मुख्य आणि उपजलवाहिन्यांमधील गळती तातडीने शोधून दुरुस्त करावी, अनधिकृत नळजोडण्या व पाणीचोरीवर कडक कारवाई करावी, तसेच संभाव्य टंचाईग्रस्त भागांची यादी तयार करून टँकर पुरवठा यंत्रणा सज्ज ठेवावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय सार्वजनिक बोअरवेल, विहिरी व पूरक जलस्रोत कार्यान्वित ठेवणे, पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींवर तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उभारणे आणि पाणी बचत, पुनर्वापर व अपव्यय नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे.

"उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने तातडीने आणि परिणामकारक उपाययोजना राबवाव्यात. पाणीपुरवठा ही मूलभूत गरज असून त्यात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही," असे महापौर रवि लांडगे यांनी स्पष्ट केले.

# वारंवार वीज खंडित; परिसरातील नागरिक त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरातील आकुर्डी, निगडी आणि चिंचवड परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढल्याने नागरिकांसह व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. तापमानात वाढ होत असल्याने घराघरात पंखे, कुलर, एसी सुरू असताना वीज वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

सध्या उकाडा वाढत असताना आणि शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असताना दुपारच्या वेळेत वीज खंडित होत असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. उष्णतेमुळे आधीच नागरिक हैराण झाले असताना त्यात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आकुर्डी, निगडी आणि चिंचवड परिसरात विविध कारणांमुळे वारंवार वीजपुरवठा खंडित केला जातो. यामुळे दैनंदिन कामकाज, लहान उद्योग, दुकाने तसेच घरगुती कामांवर परिणाम होत आहे. वारंवार वीज खंडित होत असल्याने व्यावसायिकांनाही आर्थिक फटका बसत आहे.

या पार्श्वभूमीवर महावितरण यांनी वीजपुरवठा सुरळीत करावा, वारंवार होणारे वीज खंडित प्रकार थांबवावेत आणि नागरिकांची गैरसोय टाळावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये महावितरणविरोधात संतापाची भावना व्यक्त होत आहे.

# शेवग्याचे दर घसरले; बिन्स, मटार महागले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडई येथे रविवारी (दि. २९) भाजीपाल्याच्या बाजारात शेवग्याची आवक वाढल्याने दरात मोठी घट झाली. गेल्या आठवड्यात १०० रुपये असणारा शेवगा ४० रुपये किलो दराने विक्रीस उपलब्ध होता. बिन्स आणि मटारची आवक कमी झाल्याने त्यांच्या दरात वाढ झाली आहे.

बाजारात बिन्स आणि मटार प्रत्येकी सुमारे १०० रुपये किलो दराने विक्री होत होते, तर मिरची ८० रुपये किलो दराने विकली जात होती. कर्नाटक कैरी ५० ते ६० रुपये किलो दराने उपलब्ध होती. कराड येथील रताळी बाजारात दाखल झाली आहेत. भाजीपाल्यांमध्ये कोबी ३० रुपये, फ्लॉवर ४० रुपये, वांगी ४० रुपये, कारली ६० रुपये, दोडका ६० रुपये, लाल भोपळा ४० रुपये, बीट ३० रुपये, गाजर ४० रुपये, गवार १०० रुपये, लसूण १०० ते १५० रुपये, आले ६० ते ७० रुपये, दुधी भोपळा ४० रुपये, सिमला मिरची ६० ते ७० रुपये किलो दराने विक्री झाली. पालेभाज्यांमध्ये कोथिंबीर १५ ते २० रुपये, मेथी २० ते २५ रुपये, पालक १५ ते २० रुपये, शेपू १० ते १५ रुपये, राजगिरा २० रुपये, पुदिना १० रुपये, मुळा २० रुपये, चवळई २० रुपये, लाल माठ १५ रुपये, कांदापात १५ ते २० रुपये, करडई २० रुपये, आळू पाने १० रुपये जुडी, चुका २० रुपये जुडी असे दर होते.

# नैसर्गिक बॉडी बिल्डिंगकडे तरुणांनी वळावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** तरुणांनी स्टिरॉइड्ससारख्या औषधांचा वापर करून कृत्रिम शरीरसौष्ठव करण्यापेक्षा नैसर्गिक बॉडी बिल्डिंगकडे लक्ष देत निरोगी जीवनशैलीचा अवलंब करावा, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवडमध्ये महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली असून देशभरातील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि पिंपरी चिंचवड अमेच्यूर बॉडी बिल्डिंग असोसिएशन यांच्या सहकार्याने 'महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा २०२६' चे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, शितल शिंदे, मंदार देशपांडे, नगरसदस्या अर्चना सस्ते तसेच इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे डॉ. संजय मोरे, राजेश सावंत, ॲड. सचिन रणदिवे, महापालिकेचे उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह स्पर्धक आणि नागरिक उपस्थित होते.

## १५० ते २०० कोटींच्या फसवणुकीचा संशय

# मार्केटयार्ड फंड स्कॅमने पुण्यातील व्यापारी वर्तुळ हादरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहरातील सर्वात मोठ्या व्यापारी केंद्रांपैकी एक असलेल्या मार्केटयार्ड येथे उघडकीस आलेल्या बहुचर्चित फंड स्कॅममुळे व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली आहे. डेली कलेक्शनच्या नावाखाली तब्बल दीडशे ते दोनशे कोटी रुपयांच्या फसवणुकीचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाने अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक जाळ्याचा पर्दाफाश झाल्याचे बोलले जात आहे.


या प्रकरणी समीर विनायक आखाडे यांनी मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून बाजार समितीचा माजी सदस्य अनिल दिनकर देवडे (६३), रोहन अनिल देवढे (३७) आणि चंद्रशेखर नारायण देवढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, भाजीपाला विभागातील व्यापाऱ्यांना आरोपींनी आकर्षक गुंतवणूक योजना दाखवली. दररोज ५०० रुपये फंडामध्ये जमा करा आणि त्यावर दोन टक्के परतावा मिळेल, असे आश्वासन देत अनेक व्यापाऱ्यांना या योजनेत गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले. सहा वर्षांत मोठा नफा मिळेल, या आशेने व्यापाऱ्यांनी लाखो ते कोट्यवधी रुपये गुंतवले. फिर्यादी समीर आखाडे यांनी २०१४ ते २०२२ या कालावधीत तब्बल ३ कोटी ३१ लाख ४४ हजार रुपये गुंतवले असल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, योजना पूर्ण झाल्यानंतरही कोणताही परतावा न मिळाल्याने संशय निर्माण झाला. पैसे मागितल्यावर आरोपींकडून टाळाटाळ आणि विविध कारणे सांगितली जात होती. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर व्यापाऱ्यांनी पोलिसांकडे धाव घेत तक्रार नोंदवली. या स्कॅममध्ये सुमारे १०० ते १५० व्यापाऱ्यांनी गुंतवणूक केल्याची माहिती समोर आली आहे. अनेकांकडे व्यवहारांची पावती किंवा कागदपत्रे नसल्याने ते पुढे येण्यास घाबरत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष फसवणुकीची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आरोपींनी डेली कलेक्शनबरोबरच डाळींच्या व्यवसायाच्या नावाखालीही मोठी गुंतवणूक उभी केल्याची माहिती सूत्रांनी दिली. या योजनेत मोठ्या व्यापाऱ्यांचाही सहभाग असल्याने एकूण घोटाळा १५० ते २०० कोटी रुपयांच्या घरात जाऊ शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. फसवणुकीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांची भेट घेतली. त्यानंतर मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे करत आहेत.

# दोन अवैध बांगलादेशी घुसखोर नागरिक सापडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** भाडेकरार न करता तसेच भाडेकरूंची माहिती पोलिस ठाण्यात नोंदविण्याच्या नियमाचे उल्लंघन करत बांगलादेशी नागरिकांना आश्रय दिल्याप्रकरणी उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी दोन घरमालकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

या कारवाईत मेखैरुल इस्लाम आणि इद्रीस गाझी हे दोघे संबंधित घरांमध्ये राहत असल्याचे आढळून आले. पोलिस तपासात हे दोघे बेकायदेशीररीत्या वास्तव्य करत असल्याची बाब उघड झाली आहे.

या प्रकरणी श्रीकांत बोत्रे (रा. खालुंब्रे, ता. खेड) आणि सुरेखा कांबळे (रा. महाळुंगे इंगळे) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार, घरमालकांनी आपल्या भाडेकरूंची संपूर्ण माहिती संबंधित पोलिस ठाण्यात देणे बंधनकारक आहे. मात्र, संबंधित घरमालकांनी ही माहिती जाणीवपूर्वक न दिल्याने तसेच नियमांचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### शिकारी प्रकरणी तीन जण ताब्यात

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील राजगड तालुका परिसरात वन्यजीव शिकारीच्या वाढत्या घटनांवर वनविभागाने मोठी कारवाई करत तीन शिकाऱ्यांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई दि. २९ मार्च २०२६ रोजी मौजे रांजनेफाटा येथे करण्यात आली. वनपरिमंडळ आंबेगाव व वनपरिक्षेत्र वेल्हे अंतर्गत वनविभागाला गुप्त माहिती मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. काही शिकारी येणार असल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने मौजे रांजनेफाटा येथे कारवाई करत कोंडगाव येथील मारुती बबन दारवडकर तसेच निगडे मोसे येथील दत्तात्रय लक्ष्मण नलावडे आणि गोरख हनुमंत नलावडे या तिघांना रंगेहाथ पकडले. आरोपींकडून वन्यजीव भेकर (पिसोरी) या प्राण्याचे मांस तसेच शिकारीसाठी वापरण्यात आलेली हत्यारे जप्त करण्यात आली. वनविभागाने तिन्ही आरोपींना पुढील चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

### पोलिस कर्मचाऱ्याच्या घरात चोरी

**दौंड :** घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेर गेलेल्या पोलिस कर्मचाऱ्याच्या घरात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून सुमारे ३ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना बालाजीनगर परिसरात उघडकीस आली असून, तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत सोमनाथ संताजी खाडे यांनी दौंड पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली. खाडे हे रायगड पोलिस दलात हवालदार असून सध्या सोलापूर येथे प्रशिक्षणासाठी नियुक्तीवर आहेत. खाडे कुटुंब २२ मार्च रोजी घराला कुलूप लावून सोलापूरला गेले होते. २७ मार्च रोजी शेजाऱ्यांनी घराचे कुलूप तुटल्याची माहिती दिल्यानंतर ते घरी परतले असता घरातील कपाटे उघडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीस गेल्याचे आढळले. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माऊली मंदिरात आकर्षक पुष्पसजावट, इंद्रायणी घाटावर आरती

# आळंदीत कामदा एकादशी उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे कामदा एकादशी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम हरिनाम गजरात उत्साहात पार पडले. मंदिरात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली होती, तर इंद्रायणी नदी घाट येथे इंद्रायणी आरती संपन्न झाली.

कामदा एकादशी दिनी प्रथा आणि परंपरांचे पालन करत दिवसभर धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळी महाप्रसाद वाटप करण्यात आले. त्यानंतर श्रीगुरु हैबतबाबा दिंडीची पायी नगरप्रदक्षिणा हरिनाम गजरात काढण्यात आली. मंदिराच्या गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्पसजावट करण्यात आली होती. दिवसभर भाविकांची मंदिर परिसरात मोठी गर्दी होती. भाविकांनी श्रींचे दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालत एकादशी साजरी केली. श्रींना फराळ नैवेद्यही अर्पण करण्यात आला.

इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समितीच्या वतीने आरती आयोजित करण्यात आली. आरतीपूर्वी नदी घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. भाविक आणि नागरिकांनी सहभागी होत हरिनाम गजरात इंद्रायणी आरती केली. हरिनाम जयघोषात आरतीचा कार्यक्रम मंगलमय वातावरणात पार पडला.

या प्रसंगी इंद्रायणी आरती सेवा समितीच्या संयोजिका अनिता झुजम, आवेकर भावे रामचंद्र संस्थानचे विश्वस्त संयोजक अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर तौर, माऊलींच्या पालखी सोहळ्याचे मानकरी माऊली कुऱ्हाडे पाटील यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

दरम्यान, आषाढी पायी वारी पालखी सोहळ्यासाठी आळंदी येथून ८ जुलै रोजी माऊलींच्या पालखीचे प्रस्थान होणार आहे. परंपरेनुसार ९ जुलै रोजी पहिला मुक्काम होईल. त्यानंतर आळंदीतील गांधीवाडा येथून श्रींची पालखी पुण्याकडे दोन दिवसांच्या मुक्कामासाठी मार्गस्थ होणार आहे. पालखी सोहळ्याचे सविस्तर वेळापत्रक लवकरच संस्थानच्या वतीने जाहीर करण्यात येणार आहे.

## कडाक्याच्या उन्हामुळे कैऱ्यांचे नुकसान; उत्पादनात घट होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात वाढलेल्या कडाक्याच्या उन्हाचा मोठा फटका कैऱ्यांच्या उत्पादनाला बसू लागला असून अनेक ठिकाणी झाडांवरील कैऱ्या पिवळट होत अकाली गळून पडत आहेत. त्यामुळे यंदा उत्पादनात घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

मार्च महिन्याच्या उत्तरार्धापासून तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. या वाढत्या उष्णतेमुळे कैऱ्यांच्या वाढीवर परिणाम होत असून अनेक गावांमध्ये झाडांवरून कैऱ्या गळत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः आंबेगाव तालुकाच्या पूर्व भागात शेतकऱ्यांच्या बांधांवर आंब्यांच्या विविध जातींची झाडे मोठ्या प्रमाणावर आहेत. दरवर्षी कैऱ्यांची विक्री हा शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा हंगामी उत्पन्नाचा स्त्रोत असतो. कैऱ्यांपासून लोणचे, पन्हे तसेच विविध पदार्थांसाठी मोठी मागणी असते. त्यामुळे शेतकऱ्यांना कैऱ्यांना चांगला दर मिळतो. त्यानंतर पिकलेल्या आंब्यांच्या विक्रीतूनही शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. मात्र यंदा वाढत्या तापमानामुळे कैऱ्यांना मोठा फटका बसत आहे.

अनेक ठिकाणी कैऱ्या पिवळसर पडून वेळेआधीच गळत आहेत. जमिनीवर पडलेल्या कैऱ्या उष्णतेमुळे लगेच खराब होत असल्याने विक्रीवरही परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आंबा उत्पादक देवराम टेमगिरे यांनी सांगितले की, उन्हाळ्याची तीव्रता एवढ्या प्रमाणात वाढेल असे वाटले नव्हते. कैऱ्यांची वाढ व्यवस्थित सुरू असतानाच कडाक्याच्या उन्हामुळे गळती वाढू लागली आहे. यामुळे उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे.

## पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे भूमिपूजन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** वळती (ता. आंबेगाव) येथे पुणे जिल्हा परिषद पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागांतर्गत मंजूर झालेल्या पशुवैद्यकीय चिकित्सालय श्रेणी-१ दवाखान्याच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या हस्ते नुकतेच उत्साहात पार पडले.

या दवाखान्याच्या उभारणीमुळे परिसरातील पशुपालकांना आधुनिक व तत्काळ पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून पशुधनाच्या आरोग्याबाबत मोठा दिलासा मिळणार आहे. ग्रामीण भागातील दुग्धव्यवसाय आणि पशुपालन व्यवसायाला यामुळे चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास भीमाशंकर साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, शरद बँकेचे संचालक शिवाजीराव लोंढे, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका मयुरी भोर, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष धोंडीभाऊ भोर, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष रमेश खिलारी, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष वैभव उंडे, भीमाशंकर कारखान्याचे माजी संचालक किसनराव लोखंडे, बारकू बेनके, सरपंच आनंद वाव्हळ, उपसरपंच तेजस भोर, मनोहर शेळके, ग्रामसेविका ज्योती वेताळे, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी या प्रकल्पामुळे पशुपालकांना होणाऱ्या फायद्यांवर भाष्य करत, अशा प्रकल्पांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास यावेळी बोलताना व्यक्त केला.

## डोंगरावर वणवे लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

### आंबेगाव पूर्व भागातील नागरिकांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील डोंगररांगांमध्ये अज्ञात व्यक्तींमार्फत मोठ्या प्रमाणात वणवे लावले जात असल्याच्या घटना समोर येत असून यामुळे वनसंपदा आणि वन्यजीवांचे मोठे नुकसान होत आहे. वणवे लावणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी निसर्गप्रेमी व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

आंबेगाव तालुकाच्या पूर्व भागातील जारकरवाडी, पोंदेवाडी आणि धामणी परिसरात वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. शनिवार (दि. २८) रोजी रात्री जारकरवाडीच्या ढोबळेवाडी परिसरातील डोंगरावर अज्ञात व्यक्तींनी आग लावल्याची घटना घडली. तसेच वडाची दरा, बोगद्यावरील भाग आणि बैलगाडा शर्यत घाट परिसरातही आग लागल्याच्या घटना घडल्या. या आगीत मोठ्या प्रमाणात वनसंपदा, विविध पक्षी, प्राणी, औषधी वनस्पती तसेच सरपटणारे प्राणी आगीच्या भक्षस्थानी पडत आहेत. काही ठिकाणी नुकतीच लावलेली वनरोपेही जळून जात असल्याने पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे वणवे लावणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. शनिवारी रात्री सुमारे १२ ते पहाटे ४ वाजेपर्यंत वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आग विझवण्यासाठी मोठे प्रयत्न केले. वन विभागाच्या वतीने अशा स्वरूपाच्या आगी लावणाऱ्या व्यक्तींची माहिती नागरिकांनी द्यावी, माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच वणवे लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचेही वन विभागाने स्पष्ट केले आहे.

## टाकळकरवाडीच्या पाच विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**राजगुरुनगर :** खेड तालुकामधील टाकळकरवाडी येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी केंद्रीय शासनाच्या प्रतिष्ठित नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुख्याध्यापक सदानंद माळशिरसकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रेयस शरद साळुंखे, काव्या नितीन चव्हाण, वरद संतोष माळी, आदित्य समीर कानवडे आणि वेदांत जितेंद्र पाटील या विद्यार्थ्यांची पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय, शिरुर येथे इयत्ता सहावीसाठी निवड झाली आहे.

पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून एकूण ८० विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यापैकी तब्बल ६२ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधील असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी दिली. संपूर्ण जिल्ह्यात खेड तालुका येथील जिल्हा परिषद शाळांमधील २१ विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेत यश मिळवले आहे. या यशामागे शिक्षक सुरेश आदक आणि मंदा आदक यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. नवोदय विद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत सीबीएसई अभ्यासक्रमानुसार मोफत व दर्जेदार निवासी शिक्षणाची सुविधा उपलब्ध होते. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालये विशेष प्रसिद्ध आहेत.

या यशाबद्दल आमदार बाबाजी काळे, पंचायत समिती सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्या दीप्ती भोगाडे, तसेच विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भीमा पाटस कारखान्यात बगॅसला भीषण आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** पाटस येथील भीमा पाटस सहकारी साखर कारखाना परिसरातील बगॅसला सोमवारी (दि. ३०) सकाळी सुमारे सव्वा दहाच्या दरम्यान अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत बगॅस भरण्यासाठी उभा असलेला एक ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, कारखाना परिसरात साठवून ठेवलेल्या बगॅसला अचानक आग लागली. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले. यावेळी घटनास्थळी उभा असलेला ट्रक आगीच्या विळख्यात सापडला आणि पाहता पाहता पूर्णपणे जळून खाक झाला.

आग लागल्यानंतर परिसरात एकच धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. स्थानिक नागरिकांनीही आग विझविण्यासाठी मदत केली.

कारखान्याच्या दक्षिण बाजूस बगॅसचा मोठा साठा असल्याने आग पसरू नये यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली. कारखान्याच्या संरक्षण भिंतीबाहेर मोटेवाडी रोड, शेती तसेच कारखान्याची शाळा असल्याने आग मोठी होण्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र वेळेवर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला असून बगॅसही जळाल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. या आगीचे नेमके कारण काय, याबाबत तपास सुरू आहे.

## उन्हाचा मेंढपाळांना तडाखा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** वाढत्या उन्हामुळे भटकंती करणाऱ्या धनगर मेंढपाळ कुटुंबांचे हाल वाढले असून चारा व पाण्याअभावी त्यांची परिस्थिती बिकट होत चालली आहे. आंबेगाव तालुकाच्या पूर्व भागात सध्या धनगर मेंढपाळांचे तात्पुरते वास्तव्य मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.

अहिल्यानगर जिल्हा येथील अनेक धनगर मेंढपाळ शेळ्या-मेंढ्यांचे कळप घेऊन चाऱ्याच्या शोधात आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात दाखल झाले आहेत. मात्र, वाढत्या उन्हामुळे त्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. गावोगावी आणि शेतशिवारात तात्पुरते मांडव करून या कुटुंबांना राहावे लागत आहे. दिवसभर प्रखर उन्हाचा तडाखा बसत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांची अक्षरशः होरपळ होत आहे. विशेषतः लहान मुलांचे हाल अधिक होत असल्याचे चित्र आहे.

सध्या चाऱ्याची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. शेतामध्ये उरलेला चारा संपत चालला असून पाण्यासाठीही दूरवर पायी फिरावे लागत आहे. त्यामुळे शेळ्या-मेंढ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. चरायला योग्य जागा मिळत नसल्याने मेंढपाळांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

धनगर मेंढपाळ लखन तिखुळे यांनी सांगितले की, यंदाचा उन्हाळा गेल्या अनेक वर्षांपेक्षा कठीण आहे. चारा नाही, पाणी नाही, त्यामुळे आम्ही आणि आमच्या जनावरांचे हाल सुरू आहेत. पुढील दोन महिने आणखी कठीण जाणार असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

## पोंदेवाडी येथील वस्तीमध्ये दिवसाढवळ्या फिरतोय बिबट्या

# अन्न-पाण्याच्या टंचाईमुळे वन्यजीव मानवी वस्तीकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुका परिसरात अन्न आणि पाण्याच्या शोधात वन्यजीवांचा मानवी वस्तीकडे वावर वाढल्याचे चित्र समोर येत आहे. तीन दिवसांपूर्वी पोंदेवाडी येथील वस्तीमध्ये दिवसाढवळ्या बिबट्या फिरत असल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पूर्व आंबेगावातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, ज्ञानेश्वरवस्ती, पोंदेवाडी, पहाडदरा, लोणी-धामणी, खडकवाडी या डोंगरपट्ट्यात बिबट्यासह मोर, हरीण, तरस, रानडुक्कर, लांडगे, मुंगूस आणि वानर यांसारख्या वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. मात्र, वाढते तापमान, वारंवार लागणारे वणवे आणि चारा-पाण्याची टंचाई यामुळे या प्राण्यांचा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे जंगलातील पाणवठे आटत चालले असून ओल्या चाऱ्याची कमतरता भासत आहे. परिणामी, अन्न आणि पाण्याच्या शोधात वन्यजीव गावांकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः बिबट्यांचा मानवी वस्तीत वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

वनक्षेत्रात जाणूनबुजून लावले जाणारे वणवे हे या समस्येचे एक प्रमुख कारण असल्याचे वन्यजीव अभ्यासकांचे मत आहे. आगीमुळे जंगलातील वनस्पती, चारा आणि पाण्याचे स्रोत नष्ट होत असून प्राण्यांचे अधिवास उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र होण्याची शक्यता वाढली आहे.

परिसरातील नागरिकांनी वन विभागाने डोंगरभागात पाणवठे, वनतळी आणि खाद्यसाठा वाढवण्याची मागणी केली आहे. तसेच वणवे लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचीही मागणी होत आहे.

सध्या वाढत्या उष्णतेमुळे नागरिक आधीच हैराण झाले असताना वन्यजीवांच्या वाढत्या वावरामुळे भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी वन विभागाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## वनपाल सोनल भालेराव यांना रजत पदक जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी :** वनसंरक्षण आणि वन्यजीव संरक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सोनल भालेराव यांना राज्य शासनाचे रजत पदक जाहीर करण्यात आले आहे. सन २०२४-२५ या कालावधीत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत हा सन्मान जाहीर झाला आहे.

मंचर वनपरिक्षेत्रात कार्यरत असलेल्या भालेराव यांनी मागील तीन वर्षांत धामणी तसेच गेल्या एका वर्षापासून कळंब वनपरिमंडळात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या कार्यामध्ये विविध योजनांतर्गत सुमारे ७० हेक्टर क्षेत्रावर यशस्वी रोपवाटिका व वृक्षलागवड, चार लाखांहून अधिक रोपांची निर्मिती, जलमृदसंवर्धनाची व्यापक कामे यांचा समावेश आहे. तसेच वन्यप्राणी बचाव मोहीम, बिबट्यासह इतर प्राण्यांचे रेस्क्यू करून त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडणे, वनक्षेत्रात पाणवठे निर्माण करणे अशा उपक्रमांमुळे वन्यजीवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## सारांश वृत्त

### आंध्र प्रदेश येथे नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**अमरावती:** सी. नारायण राव याच्यासह नऊ माओवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे, अशी माहिती आंध्र प्रदेशचे डीजीपी हरीश कुमार गुप्ता यांनी सोमवारी दिली. त्यांनी असाही दावा केला की, राज्यात डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवाया संपुष्टात आल्या आहेत. डीजीपींनी नमूद केले की, केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ पूर्वी नक्षलवादी अतिरेकी कारवाया संपवण्याचे आश्वासन दिले होते आणि राज्य पोलिसांनीही या उद्दिष्टपूर्तीसाठी आपला वाटा उचलला आहे.

### खोऱ्यात १०० टक्के ई-चलन प्रणाली

**जम्मू** : जम्मू आणि काश्मीर सरकारने सोमवारी राज्य विधानसभेला माहिती दिली की, केंद्रशासित प्रदेशातील वाहतूक अंमलबजावणी यंत्रणा पूर्णपणे १०० टक्के ई-चलन प्रणालीमध्ये रूपांतरित झाली असून, २०२५ मध्ये ५२,००० हून अधिक चलन जारी करण्यात आले आहेत. नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार अली मोहम्मद सागर यांना दिलेल्या लेखी उत्तरात परिवहन मंत्री सतीश शर्मा म्हणाले, ई-चलनांची संख्या ५२,५४३ पर्यंत वाढली. जप्त केलेल्या वाहनांमध्ये ४२९ वरून १,५२८ पर्यंत मोठी वाढ झाली. वाहतूक अंमलबजावणी संस्थांनी शंभर टक्के ई-चलन प्रणालीचा अवलंब केला आहे, असे ते म्हणाले.

### रांचीमध्ये लुटमारीत १० जणांना अटक

**रांची** : झारखंडच्या रांचीमध्ये लुटमारीच्या अनेक प्रकरणांमध्ये कथितरित्या सहभागी असलेल्या एका टोळीच्या १० सदस्यांना पोलिसांनी अटक केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. गेल्या दोन आठवड्यांत पाच पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्याविरोधात सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती एसपी (शहर) परांस राणा यांनी दिली. "शनिवारी मिळालेल्या माहितीच्या आधारे आम्ही त्यांना अटक केली. आरोपी लूटमार आणि दरोड्याच्या अनेक प्रकरणांमध्ये सामील होते," असे राणा म्हणाले.

## तीश कुमार यांचा विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा

# बिहारच्या राजकारणात नवा अध्याय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पाटणा** : राज्यसभेवर निवडून आल्यानंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सोमवारी बिहार विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यामुळे बिहारच्या राजकारणात नव्या अध्यायाला सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

बिहार विधान परिषदेचे अध्यक्ष अवधेश नारायण सिंह यांनी पाटणा येथे पत्रकारांशी बोलताना नितीश कुमार यांच्या राजीनाम्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री निवासस्थान १, आणे मार्ग येथे भेटीदरम्यान नितीश यांनी आपला राजीनामा देण्याचा निर्णय कळवला. राजीनामा स्वीकारण्यात आला असून आवश्यक औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर ही जागा रिक्त घोषित केली जाणार आहे. यानंतर जनता दल (युनायटेड) म्हणजेच जनता दल (युनायटेड) चे विधान परिषद सदस्य संजय गांधी यांनी विधान परिषदेत जाऊन नितीश कुमार यांचा राजीनामा औपचारिकरित्या अध्यक्षांकडे सुपूर्द केला.

दरम्यान, जेडीयूचे ज्येष्ठ नेते आणि बिहारचे संसदीय कामकाज मंत्री विजय कुमार चौधरी यांनी सांगितले की, नितीश कुमार यांनी घटनात्मक तरतुदींनुसार हा राजीनामा दिला आहे. तसेच त्यांनी संकेत दिले की, नितीश कुमार येत्या काही दिवसांत मुख्यमंत्रीपदाबाबतही मोठा निर्णय घेऊ शकतात.

नितीश कुमार हे २००६ पासून बिहार विधान परिषदेचे सदस्य होते. ७ मे २०२४ रोजी ते सलग चौथ्यांदा विधान परिषदेवर निवडून आले होते आणि त्यांचा कार्यकाळ ६ मे २०३० पर्यंत होता. मात्र १६ मार्च रोजी राज्यसभेवर निवडून आल्यानंतर त्यांना विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देणे आवश्यक होते.

राजकीय कारकिर्दीत नितीश कुमार यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांसह राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सदस्य म्हणून काम केले आहे. १९८५ मध्ये हरनौत मतदारसंघातून ते पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले होते, तर १९८९ मध्ये ते लोकसभेवर निवडून गेले होते.

नितीन नवीन यांनी बांकीपूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदारकीचा राजीनामा दिला आहे. नितीश कुमार आणि नितीन नवीन हे दोघेही १६ मार्च रोजी राज्यसभेवर निवडून आले होते. नितीन नवीन यांनी वडील नवीन किशोर प्रसाद सिन्हा यांच्या निधनानंतर पोटनिवडणूक जिंकून राजकारणात प्रवेश केला होता. २७ एप्रिल २००६ रोजी ते पहिल्यांदा पाटणा पश्चिम मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. त्यानंतर त्यांनी बांकीपूर मतदारसंघातून सलग चार वेळा विजय मिळवत पाच वेळा आमदारकी मिळवली. बिहारमधील एनडीए सरकारमध्ये त्यांनी रस्ते बांधकाम, शहरी विकास व गृहनिर्माण, तसेच कायदा यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली आहेत. २० जानेवारी २०२६ रोजी त्यांची भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

## विकासाच्या मुद्द्यावर विजयन चर्चेला तयार




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम** : केरळचे मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांनी विकासाच्या मुद्द्यावर चर्चा करण्याच्या विरोधी पक्षांच्या आव्हानाला प्रतिसाद देत डाव्या लोकशाही आघाडी सरकारच्या कामगिरीचे 'रिपोर्ट कार्ड' जाहीर केले आहे.

फेसबुक पोस्टद्वारे विजयन यांनी एलडीएफ सरकारच्या गेल्या दशकातील कामगिरीचा आढावा घेत स्वतःलाच १० पैकी १० गुण दिले. या रिपोर्ट कार्डमध्ये 'ए+' श्रेणीतील ३७ महत्त्वाच्या कामगिरींचा उल्लेख करण्यात आला आहे. या कामगिरीमध्ये विझिंजम बंदर प्रकल्प, राष्ट्रीय महामार्गांचा विस्तार, जमिनीच्या मालकी हक्कांचे वितरण, अखंडित कल्याणकारी निवृत्तीवेतन, भारनियमनमुक्त राज्य आणि महिलांच्या सुरक्षेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा समावेश असल्याचे विजयन यांनी नमूद केले.

दरम्यान, विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन यांनी मुख्यमंत्र्यांना जाहीर चर्चेसाठी आव्हान दिले होते. विजयन यांच्या फेसबुक पोस्टनंतर दोन्ही नेत्यांमध्ये थेट चर्चा होणार का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. मात्र, सतीशन यांच्या कार्यालयाने स्पष्ट केले की, केवळ सोशल मीडिया पोस्ट पुरेशी नसून औपचारिक चर्चेसाठी निश्चित वेळ व तारीख ठरवणे आवश्यक आहे. वेळ आणि तारीख निश्चित झाल्यानंतरच विरोधी पक्षनेते चर्चेला उपस्थित राहतील, असे त्यांनी सांगितले.

## इराणी नौदल कमांडर ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान** : इस्रायलच्या हवाई हल्ल्यात इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सच्या नौदल दलाचे कमांडर अलीरेझा तंगसिरी ठार झाल्याची अधिकृत पुष्टी इराणने सोमवारी केली. होर्मुझ सामुद्रधुनी रोखण्याच्या रणनीतीसाठी ते जबाबदार होते, असा दावा इस्रायलने केला आहे.

इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सच्या 'सेपाह न्यूज' संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या निवेदनानुसार, गेल्या आठवड्यात इस्रायली हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तंगसिरी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी यापूर्वीच जाहीर केले होते की, इस्रायली हवाई हल्ल्यात तंगसिरी ठार झाले. त्यांनी त्यांना "होर्मुझ सामुद्रधुनीत सुरुंग पेरून ती रोखण्याच्या कारवाईसाठी थेट जबाबदार व्यक्ती" असे संबोधले होते.

या युद्धाच्या सुरुवातीपासून इराणने होर्मुझ सामुद्रधुनी या महत्त्वाच्या जलमार्गावर प्रभावी नाकेबंदी लादल्याचे मानले जाते. यामुळे जागतिक ऊर्जा किमतींवर मोठा परिणाम झाला आहे. तंगसिरी किनारी संरक्षण व्यवस्था उभारत असताना हल्ल्यात जखमी झाले होते. "शत्रू पूर्णपणे नष्ट होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही," अशी शपथ त्यांनी घेतली होती, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. इराणने युद्धात ठार झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये तंगसिरी हे नवीनतम नाव असल्याचे सांगितले.

१९८० ते १९८८ दरम्यानच्या इराण-इराक युद्ध मध्ये सहभागी असलेले तंगसिरी हे रिव्होल्युशनरी गार्ड्सच्या नौदलातील सर्वाधिक अनुभवी अधिकाऱ्यांपैकी एक होते. २०१८ मध्ये त्यांची या नौदल शाखेच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली इराणी रिव्होल्युशनरी गार्ड्सचे नौदल लक्षणीयरीत्या मजबूत झाले होते.

## ममता बॅनर्जी मतदारांना धमकावत आहेत...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेस नेते मतदारांना भाजपला मतदान करू नये म्हणून धमकावत असल्याचा आरोप करत भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली.



भाजपच्या शिष्टमंडळाने भारतीय निवडणूक आयोग यांची भेट घेऊन बॅनर्जी यांना निवडणूक प्रचारात सहभागी होण्यापासून रोखावे आणि टीएमसी नेत्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली. केंद्रीय मंत्री किरन रिजिजू, पियुष गोयल, सुकांत मजुमदार, भाजपचे मुख्य प्रवक्ते अनिल बलुनी आणि राज्यसभा खासदार अरुण सिंह यांचा या शिष्टमंडळात समावेश होता.

भाजपने आपल्या याचिकेत म्हटले आहे की, राज्य प्रशासन आणि पोलीस तृणमूल काँग्रेससोबत 'सहभागी' असल्याने निष्क्रिय झाले असून संवेदनशील भागांमध्ये केंद्रीय दलांची तैनाती वाढवावी. तसेच निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी अधिक आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. ममता बॅनर्जी यांनी उत्तर बंगाल आणि इतर भागांतील जाहीर सभांमध्ये केलेली वक्तव्ये मतदारांना धमकावणारी आणि हिंसाचाराला अप्रत्यक्ष चिथावणी देणारी आहेत. त्यामुळे मुक्त, निष्पक्ष आणि शांततापूर्ण निवडणुकांना धोका निर्माण झाला असल्याचा आरोप पक्षाने केला आहे. तसेच महुआ मोईत्रा यांच्या काही वक्तव्यांचाही भाजपने याचिकेत उल्लेख केला असून, ती वक्तव्ये आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा केला आहे.

किरेन रिजिजू यांनी आरोप केला की, विधानसभा निवडणुकीत पराभवाची भीती असल्याने ममता बॅनर्जी आणि त्यांच्या पक्षाचे नेते मतदारांना धमकावत आहेत. निवडणूक आयोगाने शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतले असून पश्चिम बंगालमध्ये मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका होण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील, असे आश्वासन दिले आहे, असे त्यांनी सांगितले. पश्चिम बंगाल विधानसभेसाठी २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

## केंद्र सरकारकडून जनगणनेबाबत दिशाभूल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : जनगणनेची अनेक आकडेवारी २०२७ मध्येच प्रसिद्ध होणार असल्याचा दावा काँग्रेसने करत केंद्र सरकारवर संविधान दुरुस्ती विधेयके मंजूर करण्यासाठी 'खोटा आधार' वापरल्याचा आरोप केला आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांच्या वक्तव्याचा हवाला देत हा दावा केला. त्यांनी म्हटले की, २०२९ पर्यंत जनगणनेचे निकाल उपलब्ध होणार नाहीत, या कारणावर घटनादुरुस्ती विधेयके घाईघाईने मंजूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र जनगणना आयुक्तांच्या माहितीनुसार हा आधार चुकीचा आहे. भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी सांगितले की, यावेळी जनगणना प्रक्रिया डिजिटल पद्धतीने होणार असल्यामुळे डेटा लवकर उपलब्ध होईल आणि अनेक आकडेवारी संच २०२७ मध्येच प्रसिद्ध केले जातील. ते म्हणाले की, जनगणनेदरम्यान गोळा केलेली सर्व वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवली जाईल. ही माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत दिली जाणार नाही, न्यायालयात पुरावा म्हणून वापरता येणार नाही आणि कोणत्याही सरकारी किंवा खासगी संस्थेलाही दिली जाणार नाही. केवळ सांख्यिकीय स्वरूपातील एकत्रित डेटा प्रकाशित केला जाईल.

महिला आरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीवरून केंद्र सरकार आणि विरोधी पक्षांमध्ये वाद अधिक तीव्र झाला आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये मंजूर झालेला नारी शक्ती वंदन विधेयक जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेनंतर लागू होणार आहे. त्याआधीच दुरुस्ती करून कायदा लवकर लागू करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे.

## वडणूक कर्तव्यासाठी वन कर्मचाऱ्यांची तैनाती वादात

# माजी अधिकाऱ्यांचा सरकारवर आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : आसाममध्ये निवडणूक कर्तव्यासाठी १,६०० हून अधिक वन कर्मचाऱ्यांची तैनाती करण्याच्या निर्णयावर माजी सनदी अधिकारी आणि पर्यावरणवाद्यांच्या गटाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. या निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे आणि भारतीय निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

या संदर्भात गटाने आसाम सरकार आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. या पत्रात १९ मार्च २०२६ रोजी आसामच्या पर्यावरण, वन व हवामान बदल विभागाचे विशेष मुख्य सचिव एम. के. यादव यांनी जारी केलेल्या आदेशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या आदेशानुसार, आसाम फॉरेस्ट प्रोटेक्शन फोर्सचे सुमारे १,६०० जवान ९ एप्रिल रोजी होणाऱ्या निवडणुकांसाठी तैनात करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

निवृत्त आयएएस व आयएफएस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रादेशिक वन अधिकारी आणि भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांना निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त करू नये. याशिवाय, भारताचे सर्वोच्च न्यायालय यांनी १५ मे २०२४ रोजी दिलेल्या आदेशातही वन कर्मचाऱ्यांना त्यांच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमुळे निवडणूक कामातून सूट देण्यात आली आहे.

या पत्रावर केरळच्या माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रकृती श्रीवास्तव यांच्यासह इतर निवृत्त अधिकारी व पर्यावरणवाद्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यांनी वन्यजीव संरक्षणावर या निर्णयाचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली आहे.

विशेषतः काझीरंगा राष्ट्रीय उद्यान येथील भारतीय गेंडा, तसेच हुलॉक गिबन, गोल्डन लंगूर, पिग्मी हॉग, हत्ती आणि वाघ यांसारख्या प्रजातींच्या संरक्षणासाठी सातत्यपूर्ण देखरेख आवश्यक आहे. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर वन कर्मचाऱ्यांना निवडणूक कामात वळवल्यास शिकारीच्या घटनांना चालना मिळू शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, "एवढ्या मोठ्या संख्येने वन कर्मचाऱ्यांची निवडणुकीसाठी तैनाती केल्यास प्रत्यक्ष संरक्षण यंत्रणा कमकुवत होईल आणि संघटित वन्यजीव गुन्हेगारीला खतपाणी मिळू शकते." याचिकाकर्त्यांनी संबंधित आदेश तात्काळ मागे घेण्याची मागणी करत, भविष्यात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि न्यायालयीन निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## खारग बेट ताब्यात घेण्याचा अमेरिकेचा विचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पर्शियन आखातातील इराणचे प्रमुख तेल टर्मिनल असलेल्या खारग बेट ताब्यात घेण्याचा पर्याय अमेरिकेकडे असल्याचे विधान केले आहे. या वक्तव्यामुळे अमेरिका-इराण तणाव पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



ट्रम्प यांनी हे वक्तव्य माध्यमांशी बोलताना केले. "कदाचित आम्ही खारग बेट घेऊ, कदाचित नाही. आमच्याकडे अनेक पर्याय आहेत. मात्र असे केल्यास आम्हाला काही काळ तेथे राहावे लागेल," असे त्यांनी म्हटले. इराणच्या संरक्षण व्यवस्थेबाबत बोलताना ट्रम्प म्हणाले की, "मला वाटत नाही की त्यांच्याकडे प्रभावी संरक्षण व्यवस्था आहे. आम्ही ते ठिकाण सहज ताब्यात घेऊ शकतो." त्यांनी असेही सांगितले की, अमेरिकेने बेटावरील लष्करी ठिकाणांना लक्ष्य करून आधीच हवाई हल्ले केले आहेत.

दरम्यान, अमेरिकन सैन्याने जमिनीवर उतरल्यास आखाती अरब देशांवर हल्ले करण्याचा इशारा इराणने दिला आहे. त्यामुळे पर्शियन आखातातील परिस्थिती अधिक तणावपूर्ण होण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांनी मुलाखतीत पर्शियन आखाताचे अरुंद मुख असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनी संदर्भातही विधान केले. त्यांनी सांगितले की, इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी तेलवाहू जहाजांना सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी दिली आहे. त्यांनी आम्हाला पाकिस्तानी ध्वज असलेले १० टँकर दिले, आता ते २० देत आहेत आणि ती जहाजे सामुद्रधुनीतून जात आहेत, असे ट्रम्प यांनी म्हटले. या वक्तव्यामुळे इराणमधील अंतर्गत राजकारण आणि आंतरराष्ट्रीय वाटाघाटी याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. इराणने अमेरिकेला जमिनीवरील हल्ल्याविरोधात कठोर इशारा देत अमेरिकन सैनिकांवर हल्ला करण्यास आपले जवान तयार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे पर्शियन आखातातील भू-राजकीय परिस्थिती आणखी गंभीर होण्याची चिन्हे दिसत आहेत.


### कुवैतवरील हल्ल्यात भारतीय नागरिक ठार

**दुबई** : कुवेतमध्ये इराणने एका वीज आणि पाणी शुद्धीकरण प्रकल्पावर केलेल्या हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे. यामुळे, महिनाभरापूर्वी सुरू झालेल्या पश्चिम आशियातील या संघर्षातील मृतांची एकूण संख्या आठ झाली आहे. कुवेतच्या वीज, पाणी आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने सांगितले की, रविवारी झालेल्या हल्ल्यात या सुविधेमधील एका सेवा इमारतीचे नुकसान झाले आहे. इराण-अमेरिका संघर्ष सुरू झाल्यापासून जमिनीवर झालेला हा पाचवा भारतीय मृत्यू ठरला.

## नवीन पटनायकांची भाजपवर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भुवनेश्वर** : नवीन पटनायक यांनी ओडिशाचे माजी मुख्यमंत्री बिजू पटनायक आणि सीआयए यांचे संबंध असल्याच्या वक्तव्यावरून भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यावर तीव्र टीका केली आहे. नवीन पटनायक यांनी दुबे यांचे आरोप फेटाळून लावले. "त्या काळात मी फक्त १३ वर्षांचा होतो आणि मला परिस्थिती स्पष्टपणे आठवते. अशी विधाने पूर्णपणे निराधार आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले.



दुबे यांच्यावर टीका करताना नवीन पटनायक म्हणाले की, बिजू पटनायक यांच्यासारख्या मोठ्या नेत्यावर असे आरोप करणाऱ्यांना "मानसिक डॉक्टरांच्या उपचारांची गरज आहे." १९६२ च्या भारत-चीन युद्ध १९६२ दरम्यान बिजू पटनायक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी त्यांच्यावर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या, असे नवीन पटनायक यांनी सांगितले.

दरम्यान, बिजू जनता दल ने हे आरोप एका आदरणीय नेत्याच्या वारशाचा अपमान असल्याचे म्हटले आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्यसभा खासदार सस्मित पात्रा यांनी निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय समितीतून राजीनामा दिला असून दुबे यांनी तात्काळ माफी मागावी, अशी मागणी बीजेडीकडून करण्यात आली आहे.

## आरोपींना अटक करण्यात झालेल्या विलंबावर प्रशासनाला विचारणा

# बलात्कार प्रकरणाची उच्च न्यायालयाकडून दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची** : हजारीबाग येथे अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणाची झारखंड उच्च न्यायालय यांनी सोमवारी स्वतःहून (सुओ मोटू) दखल घेतली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने आरोपींना अटक करण्यात झालेल्या विलंबावर गंभीर प्रश्न उपस्थित करत राज्य प्रशासनाला फटकारले.

न्यायालयाने राज्याचे गृह सचिव, पोलीस महासंचालक आणि हजारीबागचे पोलीस अधीक्षक यांना या प्रकरणात सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच पीडित मुलीच्या कुटुंबाला पुरेशी सुरक्षा देण्याचे आदेशही देण्यात आले.




यापूर्वी वकील हेमंत शिकारवार यांनी प्रसारमाध्यमांतील वृत्तांचा हवाला देत हे प्रकरण न्यायालयाच्या निदर्शनास आणले होते. त्यांनी या घटनेची तुलना निर्भया प्रकरण याच्याशी करत गुन्हेगारांनी क्रूरतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्याचे म्हटले होते. न्यायालयानेही या गुन्ह्याला मानवतेला लाज आणणारे घृणास्पद कृत्य असे संबोधले.

सुनावणीदरम्यान हजारीबागचे एसपी यांनी न्यायालयाला सांगितले की, घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि फॉरेन्सिक पथक व श्वान पथकाच्या मदतीने पुरावे गोळा करण्यात आले. पोलीस महासंचालकांच्या निर्देशानुसार विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. आरोपींची ओळख पटवून लवकरच अटक करण्यात येईल, असेही त्यांनी न्यायालयाला सांगितले. मात्र, घटनेनंतर सहा दिवस उलटूनही आरोपींना अटक न होणे ही गंभीर बाब असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना रामनवमीच्या दिवशी घडली. गावात मिरवणूक सुरू असताना अल्पवयीन मुलगी मिरवणूक पाहण्यासाठी घराबाहेर गेली होती, मात्र ती परतली नाही. रात्रभर शोध घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी गावाजवळील झुडपात तिचा मृतदेह आढळला. प्राथमिक तपासात तिच्यावर बलात्कार करून हत्या करण्यात आल्याचे समोर आले.

या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून नागरिकांनी तातडीने आरोपींना अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. दरम्यान, भारतीय जनता पक्ष ने हजारीबाग बंदची हाक दिली होती. या बंदला शहर आणि ग्रामीण भागात मोठा प्रतिसाद मिळाला. बाजारपेठा बंद राहिल्या, दुकाने बंद होती आणि वाहतूकही काही प्रमाणात विस्कळीत झाली.

हजारीबागचे खासदार मनीष जयस्वाल यांनी आरोपींना तात्काळ अटक न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. दोषींना अटक करून कठोर शिक्षा मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला.